REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# उदारीकरणाचे महाराष्ट्र विद्युत निर्मिती आणि वितरणावर झालेल्या परिणामांचा अभ्यास



खोले योगिनी सुदाम[१] , डॉ. अरविंद शेलार[२]
[१] संशोधक , प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुडी, पुणे.
[२]मार्गदर्शक , श्री.सिद्धीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर, पुणे.

## प्रस्तावना :

ऊर्जा ही शाश्वत प्रक्रिया आहे. निर्माण ही होत नाही आणि लोपही पावत नाही. सातत्यपूर्ण आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधांचे महत्त्व सर्वश्रुत आहे. आधुनिक समाजासाठी विकासाच्या दृष्टीने आवश्यक अशा वाहतूक, उत्पादन व दळणवळण, तंत्रज्ञान इ. विविध क्षेत्रातील फायदे मिळविण्यासाठी तसेच त्यामध्ये प्रगती घडवून आणण्यासाठी वीज ही अत्यंत महत्त्वाची आहे. किफायतशीर दरात अखंडीत वीजपुरवठा देशाच्या परिणामकारक विकासासाठी आवश्यक आहे. आपल्या देशाला वेगाने वीजपुरवठा होणे आवश्यक आहे. याचे महत्त्व ओळखून सरकारने २००३ मध्ये वीज विषयक कायदा संमत केला. परंतु आता देशातल्या मोठ्या प्रमाणावर वीज गळती, विजेच्या दरवाढीचे प्रश्न अशा अनेक समस्या आहेत. आज देशात सुमारे २.१२ लाख मे.वॅ. विद्युत निर्मिती क्षमता आहे. यातले १.२४ लाख मे.वॅ. निर्मितीच्या क्षमतेचे प्रकल्प कोळशावर चालणारे औष्णिक विद्युत आहेत. म्हणजे देशातील ५०% पेक्षा जास्त वीज निर्मिती कोळशावर अवलंबून आहे. परंतु कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे हे प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू नाहीत. वीज नाही, तर प्रगती नाही हे लक्षात घेऊन सरकारने सर्वांगिण आर्थिक विकासासाठी विद्युत क्षेत्रात कठोरपणे सुधारणा राबविण्याशिवाय पर्याय नाही.

## उद्दिष्ट्ये :

१) विद्युत मंडळाच्या निर्मिती व वितरणातील बदलांचा अभ्यास करणे.
२) विद्युत मंडळाच्या निर्मिती व वितरण यामधील समस्यांचा अभ्यास करणे.

## गृहितके :

१) महाराष्ट्रातील विद्युत मंडळाची निर्मिती व वितरणामध्ये असमतोल आहे.

## तथ्य विश्लेषण :

भारत सरकारचे व महाराष्ट्राचे आर्थिक व सामाजिक पाहणी अहवाल, प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, वर्तमानपत्रातील विविध अग्रलेख, संदर्भ पुस्तके, संशोधन प्रबंध, मासिके, विविध वेबसाईट, सांख्यिकीय विभागाचा अहवाल, गोखले इन्स्टिट्यूट पुणे, प्रा.रामकृष्ण मोरे महाविद्यालयाचे ग्रंथालय, पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय इ. दुय्यम साधनांचा वापर अभ्यासासाठी केला जाणार आहे.

आर्थिक उत्पादनात विद्युत ऊर्जा हा घटक अत्यंत महत्त्वाचा ठरतो. कोणत्याही देशाची प्रगती पायाभूत सुविधांवर अवलंबून असते. ५० वर्षापूर्वी विद्युत ऊर्जा ही गोष्ट चैन या सदराखाली येत होती. परंतु आजच्या आधुनिक मानवी जीवनशैलीत विद्युत ऊर्जा हा एक अविभाज्य घटक बनला अहे. १९६१ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापना करण्यात आली. राज्य पातळीवर राज्य महामंडळ (एमएसइबी) स्थापना करण्याचा मुख्य उद्देश विद्युत निर्मिती, विस्तार व वितरण सुरळीत करणे हा होता. विद्युत मंडळाची निर्मिती आणि वितरण पुढीलप्रमाणे दिसून येईल.

तक्ता क्र.१.१

महाराष्ट्रातील विद्युत निर्मिती आणि वितरण

| वर्ष | निर्मिती | वृद्धीदर | वितरण | वृद्धीदर |
|---|---|---|---|---|
| २००३-०४ | ६८०११ | - | ९३१५ | - |
| २००४-०५ | ६९६१६ | २.३५ | ९७०४ | ४.१७ |
| २००५-०६ | ७१६५८ | २.९३ | ९८५६ | १.५६ |
| २००६-०७ | ७४०७१ | ३.३६ | १०२९८ | ४.४८ |
| २००७-०८ | ८०६९१ | ८.९३ | १०४१२ | १.१० |
| २००८-०९ | ८३८३० | ३.८९ | १०७१५ | २.९१ |
| २००९-१० | ९०२४८ | ७.६५ | ११८८३ | १०.९० |
| २०१०-११ | ९१६९३ | १.६० | १३२६८ | ११.६५ |
| २०११-१२ | ७६१२१ | -१६.९७ | १३६७७ | ३.०८ |
| २०१२-१३ | ९३२१८ | २२.४ | १३३०९ | -२.६९ |
| २०१३-१४ | ९५५८८ | २.५४ | १३८३० | ३.९१ |
| २०१४-१५ | ८८१२० | -७.७१ | १५४७३ | ११.८७ |

संदर्भ : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००३-०४ ते २०१४-१५

वरील तक्ता क्र. १.१ मध्ये २००३-०४ ते २०१४-१५ पर्यंतची विद्युत निर्मिती आणि वितरण तसेच वृद्धीदर दर्शविण्यात आला आहे. २००३-०४ मध्ये महाराष्ट्रातील एकूण विद्युत निर्मिती ६८०११ दशलक्ष कि.वॅ. होती. तर वितरण ९३१५ दशलक्ष कि.वॅ. तास झाले होते. २००४-०५ मध्ये निर्मिती ६९६५८ दशलक्ष कि.वॅ. होती. तर विद्युत ऊर्जेचे वितरण ९७०४ दशलक्ष कि.वॅ. तास होते. तर वृद्धीदर २.३५ होता. तर वितरणातील वृद्धीदर ४.१७ टक्के एवढा होता. तसेच २०१४ मध्ये विद्युत ऊर्जेची निर्मिती ८८१२० दशलक्ष कि.वॅ. तास असताना वृद्धीदर -७.७१ एवढा दिसून आला.

### विद्युत महामंडळाच्या निर्मिती व वितरण यामधील समस्या :

#### १) स्थापित क्षमतेतील अल्प वाढ :

महाराष्ट्र राज्यातील स्थापित क्षमतेचा अभ्यास केल्यास मागील काही दशकात खूप कमी प्रमाणात वृद्धी झाल्याचे दिसून येते. २००३-०४ मध्ये स्थापित क्षमता १६०८६ मे.वॅ. एवढी होती. तर २००४-०५ मध्ये १६३३३ मे.वॅ. स्थापित क्षमता असताना वृद्धीदर १.५३ टक्के एवढा होता. तसेच २०१४-१५ मध्ये राज्यातील एकूण स्थापित क्षमता २६८४९ मे.वॅ. असताना वृद्धीदर ३.१३ एवढा दिसून आला आहे.

#### २) निर्मिती क्षमतेचा अपुरा वापर :

स्थापित क्षमतेमध्ये देशात प्रथम क्रमांक असणाऱ्या महाराष्ट्र राज्याचा भारनियमनामध्ये दुसरा क्रमांक लागतो. याचे प्रमुख कारण म्हणजे निर्मिती क्षमतेचा अपुरा वापर हे आहे. राज्यातील विद्युत मंडळाचे एकूण ९५ पारंपारिक विद्युत निर्मिती प्रकल्पांपैकी ६४ निर्मिती प्रकल्प २६ वर्षापूर्वीचे जुने आहेत. सतत बिघाड होत असल्याने खंडीत विद्युत निर्मिती होत असते.

#### ३) विद्युत ऊर्जेची हानी आणि चोरी :

महाराष्ट्र राज्यात विद्युत चोरी मोठ्या प्रमाणावर होताना दिसून येते. वीज चोरीसाठी तपासण्यात येणाऱ्या जोडण्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. राज्यात प्रामुख्याने वीज चोरी प्रामुख्याने आकडे टाकणे, मीटरच्या सीसीची गती कमी करणे,

मिररचे एम एक बदलणे, चुंबक वापरून मीटर बंद करणे, मीटरची गिअर यंत्रणा बदलणे, टॅपिंग करणे अशा अनेक प्रकारे वीज चोरी केली जाते.

### शिफारशी :

महाराष्ट्र राज्यातील विद्युत निर्मिती आणि वितरण या घटकांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, अपेक्षित बदल घडवून आणण्यासाठी पुढील शिफारशी करण्यात येतील.

### १) सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढवावी :

खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीमध्ये वाढ करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच विकास व विस्तार होईपर्यंत सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे. तसेच नियोजित रक्कमेचा पूर्ण वापर, नियोजन वेळेत व योग्य प्रमाणात होईल याची दक्षता घेतली पाहिजे.

### २) विद्युत निर्मितीमधील सुधारणा :

विद्युत निर्मिती करत असताना जुनाट तंत्रज्ञान व यंत्र सामग्रीचा वापर थांबवून आधुनिक यंत्रसामग्रीचा अवलंब केल्यास विद्युत केंद्राची निर्मिची वाढेल.

### ३) विद्युत वितरणामध्ये सुधारणा :

विद्युत वितरणव्यवस्थेमध्ये गुंतवणूक करत असताना दीर्घकाळाचा विचार करून गुंतवणूक करण्यात यावी. तसेच वीजगळती व वीजचोरी नियंत्रित करण्यासाठी कायदेशीर नियमांची काटेकोर अंमलबजावणी केल्यास विद्युत क्षेत्रात सुधारणा घडून येण्यास मदत होईल.

### समारोप :

थोडक्यात, आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये विद्युत ऊर्जा ही एक प्रबळ शक्ती आहे. सर्वांगिण आर्थिक विकासासाठी विद्युत क्षेत्रात कठोरपणे सुधारणा राबविण्याशिवाय आता पर्याय नाही. वीज विषयक कायद्याच्या तरतुदींमध्ये संयुक्त वीज धोरणाची बीजे आहेत. हे धोरण सर्वांगीण आर्थिक विकासास साह्य करते.

### संदर्भ सूची :

१) दास्ताने संतोष, महाराष्ट्र २०१०, दास्ताने रामचंद्र ॲण्ड कंपनी प्रकाशन, पुणे.
२) भारत शासन, भारताची आर्थिक पाहणी, २००५-०६, पृ.क्र. ११-१२, १२-१३, १३-१४.
३) महाराष्ट्र शासन, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००३-०४ ते २०१३-१४, पृ.क्र. १३२-१३६.
४) www.mahadiscon.in